| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **महाराष्ट्र शासन**<br>**आरोग्य सेवा, आयुक्तालय, पुणे कार्यालय** | |
| संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु , नोंदणी, महाराष्ट्र राज्य, पुणे | २६१२२२५६ (वै)<br>२६१२२५०८ (का) | संचालक, आरोग्य सेवा , आयुक्तालय,<br>मध्यवर्ती इमारत पुणे ४११००१<br>**ईमेल - :** dhspune1@gmail.com,<br>crslegalcell@gmail.com |
| आरोग्य सेवा | | जा क्र -संआसे /मुनिजमृ/ कक्ष ८१/ ४८००-४८०५/२६<br>दिनांक - 31 / 07 /२०२६ |

प्रति

१) संचालक (प्राथमिक )

शिक्षण विभाग , पुणे

२) संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक)

शिक्षण विभाग , पुणे

विषय : CRS पोर्टल मधील जन्म प्रमाणपत्राबाबत

संदर्भ : मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची मान्यता दि. २८/०७/२०२६

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व सुधारित अधिनियम २०२३ तसेच महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० अन्वये जन्म व मृत्यू घटनांची नोंदणी केली जाते. सन २०१६ पासून महाराष्ट्र राज्यामध्ये राज्यामध्ये केंद्र शासनाने विकसित केलेल्या CRS पोर्टल द्वारे जन्म व मृत्यू घटनांची नोंदणी करण्यास सुरुवात झाली. त्यापूर्वी जन्म दाखले offline पद्धतीने व काही महानगरपालिका, नगरपरिषद व ग्रामपंचायत या त्यांनी विकसित केलेल्या software मधून online दिले जात होते. २०१६ पूर्वीचे सर्व दाखल्यांचे संगणकीकरण (digitization) अद्याप पूर्ण झालेले नसल्याने २०१६ पूर्वीचे offline जन्म दाखले हे शाळा प्रवेशासाठी ग्राह्य धरले जाणे आवश्यक आहे.

सन २०१६ ते CRS पोर्टल Revamp होईपर्यंत च्या कालावधीतील CRS पोर्टल मधील जन्म प्रमाणपत्रामध्ये सर्वात पहिल्या रकान्यात बाळाचे नाव व त्याखालील रकान्यांमध्ये आईचे पूर्ण नाव व वडिलांचे

पूर्ण नाव असा नमुना होता. CRS पोर्टल Revamp झाल्यानंतर बाळाचे नाव हे तीन रकान्या मध्ये नमूद केले जात आहे.

त्यामुळे या दोन्ही नमुन्यांमधील जन्म दाखले शाळा प्रवेशासाठी ग्राह्य धरले जावेत. जेणेकरून जुने जन्म दाखले नवीन नमुन्यांप्रमाणे सादर करण्याबाबतचा पालकांवर असलेला प्रचंड ताण कमी करून प्रकिया सुलभ करता येईल.

सद्यस्थिती मध्ये Revamped CRS पोर्टल मधून दिल्या जाणाऱ्या जन्म दाखल्याचाच आग्रह धरून प्रवेश थांबवू नयेत. ही विनंती.

(डॉ. विजय कंदेवाड )
संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा, पुणे
तथा मुख्य निबंधक,जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३) संचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
४) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजीआ), पुणे तथा उपमुख्य निबंधक (जन्म व मृत्यू ), महाराष्ट्र राज्य.